शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.७८/२०१९

| | | |
|---|---|---|
| श्री.भाऊसाहेब दिनकर पाटील | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान, ताराबाई पार्क, कोल्हापूर.<br>२. डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर. | } | वि.प. |

डॉ.डी.वाय.पाटील प्रतिष्ठान, ताराबाई पार्क, कोल्हापूर यांचे डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा, कोल्हापूर येथील शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. भाऊसाहेब दिनकर पाटील यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०९/१०/२०१९ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

**१.** महाराष्ट्र शासन निर्णय क्र.वेतन २०१९/प्र.क्र.१०५/१९ वि.शि.१ दि.०७/०९/२०१९ ने ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. सबब दि.०१/०१/२०१६ रोजी २४ वर्षाच्या दुस-या कालबध्द् पदोन्नतीनुसार येणा-या मुळ पगाराप्रमाणे ७ व्या वेतन आयोगातील वेतन निश्चिती करून दि.०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केलेल्या दिनांका पर्यंतचा फरक अदा करणेत यावा. **२.** सहाव्या वेतनआयोगाप्रमाणे दि.०१/०७/२०१८ व दि.०१/०१/२०१९ या दिनांकापासून वाढलेला प्रत्येकी ६ टक्के असा एकुण १२ टक्के महागाई भत्ता लागू करून लागू केलेल्या तारखेपर्यंतचा फरक अदा करणेत यावा.

**संस्था व महाविद्यालयाचा अभिप्राय :**

**१.** महाराष्ट्र शासनाकडून सन २०१८-१९ ते २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाअखेर विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी च्या रूपाने येणी असलेली शिष्यवृत्तीची रक्कम कोव्हीड-१९ या साथ रोगाच्या प्रादुर्भावामुळे शासनाकडे प्रलंबित आहे. तसेच कॉलेजमध्ये ॲडमिशन घेणारे विद्यार्थी देखील त्यांच्या पालकांच्या आर्थिक समस्येमुळे चालू शैक्षणिक वर्षाची फी वेळेवर भरत नाहीत. अशा विविध कारणाने

महाविद्यालयाच्या शैक्षणिक फी पुर्णपणे वसुल झालेली नाही. २. सातवा वेतन आयोग लागू करणेबाबत महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित इंजिनिअरिंग कॉलेजस, असोसिएशन, नाशिक यांचा महाराष्ट्र शासन व ए.आय.सी.टी.ई न्यु.दिल्ली यांचेबरोबर पत्रव्यवहार सुरू आहे. तरी सर्व कॉलेजनी सातवा वेतन आयोग लागू केल्यावर आमचेही कॉलेजमध्ये सातवा वेतन आयोग लागू केला जाईल. ३. १२ व २४ वर्षाच्या कालबध्द् पदोन्नतीबाबत श्री.बी.डी.पाटील व महाविद्यालय व्यवस्थापन यांचेमध्ये दि.२०/११/२०१८ रोजी समझोता करार झालेला आहे. ४. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रलंबित असलेल्या महागाई भत्याबाबत वरील प्रमाणे शासनाकडून येणे असलेली शिष्यवृत्तीची रक्कम महाविद्यालयास प्राप्त होताच, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना प्रलंबित असलेली महागाई भत्ता रक्कम दिली जाईल.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.वेतन २०१९/प्र.क्र.१०५/१९ वि.शि.१ दि.०७/०९/२०१९ ने ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. सबब दि.०१/०१/२०१६ रोजी २४ वर्षाच्या दुस-या कालबध्द् पदोन्नतीनुसार येणा-या मुळ पगाराप्रमाणे ७ व्या वेतन आयोगातील वेतन निश्चिती करून दि.०१/०१/२०१६ पासून सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी केलेल्या दिनांकापर्यंतचा फरक अदा करणेत यावा अशी मागणी अर्जात नमूद केली आहे.

या तक्रारीच्या पृष्ठयार्थ तक्रारदार यांनी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.वेतन २०१९/प्र.क्र. १०५/१९ वि.शि.१ दि.०७/०९/२०१९ सोबत जोडला आहे. तसेच तक्रारदार यांनी तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी सादर केलेले लेखी म्हणणे समितीने विचारार्थ घेतले आहे.

याबाबत संस्था व महाविद्यालयाने समितीसमोर दि.०७ सप्टेंबर २०१९ चा शासन निर्णय विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांना अद्यापी लागू नसून आपल्या संस्थेंच्या अभियांत्रिकी महाविद्यालयांस सातवा वेतन अद्यापी आयोग लागू करण्यात आलेला नाही. याबाबत शासनाशी पत्रव्यवहार सुरू असून राज्यातील इतर विनाअनुदानित अभियांत्रीकी महाविद्यालयांना सातवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर आपल्या महाविद्यालयासही तो लागू करू व तक्रारदार श्री.पाटील यांना नियमानुसार देय असणारे लाभ त्यावेळी महाविद्यालयाकडून दिले जातील असे कथन करण्यात आले. तसेच याबाबतचे हमीपत्र संस्था/महाविद्यालयाने समितीसमोर सादर केले आहे.

याबाबत दोन्ही पक्षकारांचे मत अवलोकनी घेता समितीचे मत असे की, तक्रारदार यांनी तकारीच्या पृष्ठयार्थ जोडलेला दि.०७/०९/२०१९ रोजीचा शासन निर्णय महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी/अधिकारी यांना लागू असल्याचे निदर्शनास येते.

तसेच समितीने या तक्रारीच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाशी सलंग्नित विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांना सातवा वेतन आयोग लागू आहे काय तसेच शासनाकडून याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत काय याची विद्यापीठाच्या सलंग्नता टी १ विभागाकडून माहिती घेतली असता प्राप्त माहितीच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.सावेआ-१११९/(८८-१९) ता.शि.-२, दि.१६ सप्टेंबर २०१९ चा निर्णय हा अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई या संस्थामधील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाची वेतनसंरचना लागू करण्याबाबत असल्याचे स्पष्ट होते.

तक्रारदार यांनी दि.०९/०३/२०२२ रोजीच्या दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांचे सातव्या वेतन आयोगा संदर्भातील पत्र जोडले आहे. सदर वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय हे शासन अनुदानित स्वायत्त संस्था असल्याचे स्पष्ट होते.

उपरोक्त बाबी अवलोकनी घेता समितीचे मत असे आहे की, तक्रारदार यांनी सादर केलेला सातव्या वेतन आयोगाबाबतचा शासन निर्णय हा अद्यापी अनुदानित महाविद्यालयांस लागू नसल्याचे दिसून येते. सदर महाविद्यालयाकडूनही याबाबत तसे स्पष्ट करण्यात आले असून महाविद्यालयास संस्थेने सातवा वेतन लागू केलेनंतर तक्रारदार यांना त्या अनुषंगाने देय असणारे लाभ देण्यात येतील असे लेखी हमीपत्र संस्था/महाविद्यालयाकडून देण्यात आलेले आहे. तसेच १२ व २४ वर्षाच्या कालबध्द पदोन्नतीबाबत श्री. बी. डी. पाटील व महाविद्यालय व्यवस्थापन यांचेमध्ये दि. २०/११/२०१८ रोजी समाझोता करार झालेला असल्याचे संस्थेकडून सांगण्यात आले. तक्रारदार व संस्थेने याचिका क्रमांक ६५१६/२०१६ या कामी झालेल्या तडजोडीची प्रत समितीसमोर सादर केली. त्यासोबतच्या Annexure A अवलोकनी घेतले असता त्यामध्ये (C) 12 years and 24 years time bound promotion related increments, arrears and any other related dues/claims हे सोडून दिल्याचे तडजोड शपथपत्रामध्ये दिसून येते. तसेच कालबध्द् पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ३०३३/२०२० ची सुनाावणी घेऊन आदेश झालेले आहेत. सबब वरील सर्व बाबी विचारात घेता तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील कं. १ ची मागणी समितीस मान्य करता येणार नाही. तथापी संस्था/महाविद्यालयाने समितीसमोर सादर केलेल्या हमीपत्राच्या अनुषंगाने त्याची पुर्तता करण्याची आहे.

२. तक्रारदार यांनी सहाव्या वेतनआयोगाप्रमाणे दि.०१/०७/२०१८ व दि.०१/०१/२०१९ या दिनांकापासून वाढलेला प्रत्येकी ६ टक्के भत्ता असा एकुण १२ टक्के महागाई भत्ता लागू करून लागू केलेल्या तारखेपासून फरक अदा करणेत यावा अशी तक्रार अर्जात नमूद केली आहे.

याबाबत समितीचे मत असे की, सदर संस्था व महाविद्यालय यांनी महाविद्यालयातील इतर कर्मचा-यांना ज्या दराने महागाई भत्ता दिलेला आहे त्याच दराने तक्रारदार यांना महागाई भत्ता देण्यात आलेला असल्याचे समितीच्या निदर्शनास आणले. महाविद्यालयाकडून इतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या महागाई भत्याच्या दराप्रमाणे तक्रारदार यांना वेतन मिळाल्याचे तसेच त्यांचेवर महागाई भत्याबाबत अन्याय किंवा भेदभाव झाल्याचे समितीस दिसून येत नाही. तथापी महागाई भत्याबाबत संस्था, महाविद्यालयाकडून निर्णय घेण्यात आल्यास तक्रारदार यांना देय असणारा महागाई भत्याचा फरक संस्था व महाविद्यालयाने अदा करावयाचा आहे. सद्यस्थितीत तक्रारदार यांची सदरची मागणी समितीस मान्य करता येणार नाही.

३. तक्रारदार यांनी मुळ तक्रार अर्जात नमूद केलेल्या तक्रारी व्यतिरिक्त अर्जित रजा, दुय्यम सेवापुस्तीका नोंदी करून मिळणे, उपदानाची रक्कम मिळणे इत्यादी अधिकच्या मागण्या समितीसमोर मांडलेल्या होत्या. उपदान मिळणेबाबत तक्रारदार यांनी आपण मे.न्यायालयात तक्रार दाखल केलेली असून ती प्रलंबित असल्याचे समितीसमोर कथन केले आहे. तसेच अर्जित रजा व दुय्यम सेवापुस्तीका याबाबत समितीने संस्था, महाविद्यालयास त्याची पुर्तता करण्याची सुचना केलेली होती. त्यानुसार संस्थेकडून त्याची पुर्तता करण्यात आलेली असल्याचे तक्रारदार व संस्थेने समितीसमोर कथन केले आहे. करीता समिती खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

तक्रारदार यांच्या तक्रार अर्जातील सर्व मागण्या अमान्य करण्यात येत आहेत.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

दिनांक : 18 AUG 2022

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ. एन.बी.गायकवाड)

सदस्य
(श्री.ए.ए.कुलकर्णी)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)